ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 7 | MARCH - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत इंदिरा गांधी यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास

प्रा. श्रीकांत विक्रांत सिरसाठे
उपप्राचार्य
श्री.स.ह.केळकर महाविद्यालय देवगड जि.सिंधुदुर्ग.



**सारांश:**

स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासात इंदिरा गांधी यांचे योगदान अत्यंत निर्णायक व व्यापक स्वरूपाचे आहे. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून त्यांनी केवळ राजकीय नेतृत्वच केले नाही, तर सामाजिक, आर्थिक, संरक्षण व परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात मूलगामी बदल घडवून आणले. बँकांचे राष्ट्रीयकरण, हरित क्रांती, प्रिव्ही पर्सची समाप्ती, १९७१ चे युद्ध, बांगलादेश निर्मिती, अणुकार्यक्रम, तसेच 'गरीबी हटाओ' यांसारख्या धोरणांनी आधुनिक भारताचा प्रवास नव्या दिशेने नेला. तथापि, १९७५ चा आपत्काल हा त्यांच्या कारकिर्दीतील अत्यंत वादग्रस्त टप्पा मानला जातो. प्रस्तुत शोधनिबंधात इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून त्यांच्या सकारात्मक व नकारात्मक पैलूंचा अभ्यास करण्यात आला आहे.

**की-वर्ड्स:**

इंदिरा गांधी, आधुनिक भारत, राष्ट्रीयकरण, आणिबाणी, हरित क्रांती, परराष्ट्र धोरण

## प्रस्तावना

१९४७ नंतर भारतासमोर राष्ट्रनिर्मितीचे मोठे आव्हान उभे होते. आर्थिक मागासलेपणा, सामाजिक विषमता, प्रादेशिक असमतोल व आंतरराष्ट्रीय दबाव अशा परिस्थितीत भारताचा प्रवास सुरू झाला. या कालखंडात ज्या व्यक्तिमत्त्वांनी देशाच्या वाटचालीवर खोल परिणाम घडवून आणला, त्यामध्ये इंदिरा गांधी यांचे स्थान अनन्यसाधारण आहे.

इंदिरा गांधी या केवळ पंतप्रधान नव्हत्या, तर त्या एका मजबूत इच्छाशक्तीच्या, निर्णयक्षम व कधी कधी कठोर नेतृत्वाच्या प्रतिक बनल्या. त्यांच्या धोरणांमुळे भारतातील राज्यसंस्था अधिक केंद्रीकृत झाली, परंतु त्याच वेळी गरीब, शोषित व वंचित घटक केंद्रस्थानी आले. त्यामुळे आधुनिक भारताच्या इतिहासाचा अभ्यास करताना इंदिरा गांधी यांचे योगदान संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

## संशोधनाची उद्दिष्टे

१) इंदिरा गांधी यांच्या राजकीय नेतृत्वाचे ऐतिहासिक मूल्यमापन करणे.
२) त्यांच्या आर्थिक व सामाजिक धोरणांचा आधुनिक भारतावर झालेला परिणाम अभ्यासणे.
३) आणिबाणी कालखंडाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे.
४) परराष्ट्र व संरक्षण धोरणातील त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
५) इंदिरा गांधी यांच्या वारशाचे आधुनिक भारतातील स्थान स्पष्ट करणे.

## संशोधनाची गृहितके

१) इंदिरा गांधी यांच्या धोरणांनी भारतीय राज्यसंस्थेला बळकटी दिली.
२) त्यांच्या समाजवादी धोरणांमुळे आर्थिक समावेशनाला चालना मिळाली.
३) आपत्कालामुळे भारतीय लोकशाहीवर तात्पुरता आघात झाला.
४) परराष्ट्र धोरणात भारताला जागतिक स्तरावर आत्मविश्वास प्राप्त झाला.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये:
प्राथमिक साधने : भाषणे, संसदीय चर्चा
दुय्यम साधने : पुस्तके, संशोधन लेख, चरित्रे, संदर्भग्रंथ
यांचा उपयोग करण्यात आला आहे.

## १. इंदिरा गांधी : जीवन आणि राजकीय पार्श्वभूमी

इंदिरा गांधी यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव इंदिरा प्रियदर्शिनी गांधी असे होते. त्या भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलालनेहरूयांच्या कन्या होत्या. त्यांची आई कमला नेहरू या स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्त्या होत्या.इंदिरा गांधींचे बालपण देशभक्तीच्या वातावरणात गेले. त्यांच्या घरात सतत स्वातंत्र्यसैनिकांची ये-जा असे. त्यामुळे त्यांच्यावर राष्ट्रप्रेमाचे संस्कार लहानपणा पासून झाले. त्यांनी भारतातील व परदेशातील नामांकित संस्थांतून शिक्षण घेतले. इंदिरा गांधी यांनी लहानपणी वानर सेना नावाची बाल स्वयंसेवकांची संघटना स्थापन केली. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला.१९४२ मध्ये झालेल्या छोडो भारत आंदोलना मध्ये त्यांनी सहभाग घेतला आणि त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला.१९४२ मध्ये इंदिरा गांधी यांचा विवाह फिरोज गांधी यांच्याशी झाला. त्यांना दोन मुले झाली. त्यांची नावे राजीव गांधी आणि संजय गांधी अशी होती. इंदिरा गांधी यांचा राजकीय प्रवेश भारतीय राष्ट्रीय काँग्रेसया पक्षातून झाला.

१९६६ मध्ये लाल बहादुर शास्त्री यांच्या निधनानंतर त्या भारताच्या पंतप्रधान झाल्या. प्रारंभी त्यांना 'कमकुवत नेत्या' म्हणून पाहिले गेले; परंतु त्यांनी लवकरच आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

## २. आर्थिक धोरणे आणि संरचनात्मक बदल

### २.१ बँकांचे राष्ट्रीयकरण

१९ जुलै १९६९ मध्ये इंदिरा गांधींनी ५० कोटी पेक्षा जास्त ठेवी असलेल्या बँकांचे राष्ट्रीयकरण करण्याचा निर्णय घेतला त्यानुसार १४ प्रमुख खाजगी बँकांचे सुरुवातीला राष्ट्रीयकरण करण्यात आले. अशा या ऐतिहासिक

निर्णयाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे बँकिंग सेवा सर्वसामान्य लोकापर्यंत पोहोचविणे त्याचबरोबर शेती व कर्ज पुरवठा सर्व सामान्यांना करणे त्याचबरोबर श्रीमंताच्या हाती असलेली आर्थिक सत्ता मोडीत काढून समानता प्रस्थापित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. यामुळे बँकिंग व्यवस्था ग्रामीण व गरीब घटकांपर्यंत पोहोचली. शेती, लघुउद्योग व स्वयंरोजगाराला कर्जपुरवठा वाढला.

## २.२ हरित क्रांती

इंदिरा गांधीच्या पंतप्रधानाच्या कारकिर्दीमध्ये हरित क्रांतीचा कार्यक्रम राबवून भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवण्याचे काम केले. बियाणे खते सिंचन आणि सरकारी अनुदानाद्वारे पंजाब हरियाणा या राज्यामध्ये गहू आणि तांदूळ उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविले गेले. जुलै 1968 मध्ये इंदिरा गांधींनी गहू क्रांती टपाल तिकीट जारी करून या यशाची नोंद करून ठेवली. हरित क्रांतीचा परिणाम असा झाला की अन्नधान्याच्या बाबतीत भारत दुसऱ्या देशावर अवलंबून न राहता स्वावलंबी बनला एवढेच नाही तर दुसऱ्या देशाला अन्नधान्य निर्यात करणारा देश बनला म्हणून या क्रांतीला गहू क्रांती देखील म्हटले जाते.

थोडक्यात इंदिरा गांधींनी हा धोरणात्मक निर्णय घेऊन भारतीय शेतीला पारंपारिक शेती कडून आधुनिक आणि औद्योगिक व्यवस्थेकडे वळवण्याचे काम केले.हरित क्रांतीच्या माध्यमातून भारत अन्नधान्य उत्पादनात आत्मनिर्भर झाला. पंजाब, हरयाणा, पश्चिम उत्तर प्रदेश या भागात उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. यामुळे उपासमारीचा धोका कमी झाला.

## २.३ प्रिव्ही पर्सची समाप्ती

इंदिरा गांधींनी १९७१ मध्ये २६ वी घटना दुरुस्ती करून घटनेतील अनुच्छेद २९१ आणि ३६२ हे रद्द करण्यात आले. पूर्वी राजे राजवाडे यांना देण्यात आलेले विशेष अधिकार रद्द करण्यात आले. यानुसार पूर्वी राजघराण्यांना मिळत असलेला सरकारी पैसा बंद करण्यात आला आणि समानता प्रस्थापित करण्याच्या दिशेने आणखीन एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. त्यामुळे हा निर्णय लोकशाही मूल्यांच्या दृष्टीने महत्वाचा ठरला.

## ३. सामाजिक धोरणे आणि 'गरीबी हटाओ'

इंदिरा गांधींनी १९७१ च्या निवडणुकीमध्ये गरिबी हटाव नारा देऊन सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी २० कलमी कार्यक्रम हाती घेतला, या कार्यक्रमानुसार समाजातील विषमतेची दरी कमी करण्याचा प्रयत्न झाला. त्याचबरोबर आर्थिक विषमता नष्ट करून आत्मनिर्भर बनवण्याचा प्रयत्न केला गेला. ग्रामीण विकासाच्या माध्यमातून गरिबी दूर करण्याचा प्रयत्न झाला त्यामुळे १९७१ मध्ये दिलेला गरीबी हटाव हा नारा फक्त नारा नसून गरिबांना थेट लाभ मिळवून देण्याची योजना होती. शहरातील आणि ग्रामीण भागातील गरिबापर्यंत लाभ पोहोचावा हाच उद्देश या नाऱ्याचा होता.

थोडक्यात' गरीबी हटाओ' ही केवळ घोषणा नव्हती, तर ती सामाजिक न्यायाची राजकीय दिशा होती. शिक्षण, आरोग्य, रोजगार व सार्वजनिक वितरण व्यवस्थेला अधिक महत्त्व देण्यात आले. यामुळे गरीब वर्गाला राजकीय केंद्रस्थानी स्थान मिळाले.

## ४. परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षा

### ४.१ १९७१ चे युद्ध आणि बांगलादेश निर्मिती

मार्च १९७१ मध्ये पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानामध्ये (आताचा बांगलादेश) मोठ्या प्रमाणात नरसाहार करून मानवाधिकाराचे उल्लंघन सुरू केले अशा परिस्थितीत पूर्व पाकिस्तान मधून हजारो निर्वासित भारतात आले. त्यावेळेस इंदिरा गांधींनी या निर्वाशिताच्या प्रश्नावर आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळवला. अशा परिस्थितीत तीन डिसेंबर १९७१ ला पाकिस्तान ने भारतीय हवाई तळावर हल्ला केला त्यावेळेस इंदिरा गांधींनी अधिकृतपणे युद्धाची घोषणा करून पाकिस्तानला विविध आघाडी वरती पराभव करण्यास सुरुवात केली. जनरल सॅम माणिकशा ॅ यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने पूर्व आणि पश्चिम आघाडी वरती निर्णायक लढा दिला त्यामुळे अवघ्या १३ दिवसांमध्ये पाकिस्तानने शरणागती पत्करली आणि त्यातूनच १६ डिसेंबर १९७१ ला बांगलादेशाची निर्मिती झाली. या विजयामुळे इंदिरा गांधीच्या नेतृत्वाची 'पोलादी महिला' म्हणून प्रतिमा तयार झाली. त्यामुळे १९७१ चा हा विजय भारताच्या इतिहासातील सर्वात गौरवशाली लष्करी आणि मुत्सद्दी विजयांपैकी एक मानला जातो.

### ४.२ अणुकार्यक्रम

इंदिरा गांधींनी त्यांच्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याचे काम केले होते. भारताला अनुषक्ती मध्ये स्वयंपूर्ण बनवण्याच्या दृष्टीने  कार्यक्रम हाती घेऊन अनुशक्ती निर्मितीच्या कार्यक्रमाला गती दिली. त्यानुसार १८ मे १९७४ ला 'स्माइलींग बुद्धा' या नावाने पोखरण या ठिकाणी पहिली शांततापूर्ण अणुचाचणी यशस्वी केली. इंदिरा गांधीचे या धोरणात्मक निर्णयामुळे भारत जगातील प्रमुख अनुशक्ती देश म्हणून उदयास आला त्यामुळे देशाच्या अण्वस्त्र क्षमतेचा पाया मजबूत बनला गेला. या अणुचाचणीत डॉ. होमी सेठना आणि डॉ. राजा रामण्णा यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.या अनुशक्तीच्या यशस्वी चाचणीमुळे इंदिरा गांधींना एक धाडसी नेत्या म्हणून ओळख मिळाली आणि भारत अण्वस्त्रसज्ज देशांच्या यादीत सामील झाला,आणियामुळे भारताच्याराष्ट्रीय सुरक्षेला बळकटी मिळाली.

## ५. आणिबाणी (१९७५–७७) : एक समीक्षात्मक अभ्यास

२५ जून १९७५ ते १९७७ हा २१ महिन्याचा काळ इंदिरा गांधीच्या कारकीर्दीतील अत्यंत वादग्रस्त कालखंड म्हणून ओळखला जातो राज्यघटनेच्या ३५२ व्या कलमानुसार अंतर्गत अस्थिरतेचे कारण देत इंदिरा गांधींनी आणीबाणी घोषित करून विरोधी नेत्यांना तुरुंगात डांबले. प्रेसवर सेन्सॉरशिप लादली. त्यामुळे हा काळ सत्तेच्या गैरवापराचा, लोकशाहीच्या गळचेपीचा तसेच शिस्त आणण्याचा प्रयत्न अशा भिन्न दृष्टिकोनातून पाहिला जातो. इंदिरा गांधींनी भारतात पुकारलेल्या आणीबाणीचा परिणाम असा झाला की आणीबाणीमुळे लोकशाही संरचना गोठली गेली. या काळात सत्तेचा अनियंत्रित वापर झाला आणि सर्वसामान्यांवर अत्याचार झाले. त्याचबरोबर ४२ वी घटनादुरुस्ती करून संसदेचे अधिकार अमर्याद करण्याचा आणि न्यायव्यवस्थेची ताकद कमी करण्याचा प्रयत्न केला गेला.१९७७ मध्ये इंदिरा गांधींनी अचानक आणीबाणी उठवली आणि निवडणुका जाहीर केल्या. या निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव झाला आणि देशात पहिल्यांदाच जनता पार्टीचे सरकार स्थापन झाले. थोडक्यात १९७५-७७ ची आणीबाणी हा भारतीय लोकशाहीसाठी एक धडा ठरली. इंदिरा गांधींनी सत्तेसाठी लोकशाही मार्गांचा त्याग केला,तरीही भारतीय जनतेने मतदानातून आपला निषेध नोंदवला. या

काळाने भारतीय राज्यघटनेतील आणीबाणीच्या वापरावर मर्यादा आणल्या. हा अनुभव भारतीय लोकशाहीसाठी आत्मपरीक्षणाचा ठरला.

## ६. इंदिरा गांधी मृत्यू आणि वारसा

इंदिरा गांधी देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून यांनी तीन टर्म यशस्वीपणे काम केले भारत देशाला विकासाच्या मार्गावर नेत असताना काही कठोर निर्णय देखील त्यांना घ्यावे लागले, त्यापैकीच एक असा कठोर निर्णय होता तो म्हणजे अमृतसर मधील ब्लू स्टार  ही लष्करी कारवाई. ही लष्करी कारवाई जर्नल सिंग भिंद्रणवाला यांचा फुटीरता वाद मोडीत काढण्यासाठी म्हणून ही लष्करी कारवाई करावी लागली. जर्नल सिंग भिंद्रणवाला त्याने सुवर्ण मंदिराच्या आश्रय घेऊन मोठ्या प्रमाणात खलिस्तानच्या मागणीसाठी दहशत निर्माण केली होती. हे दहशत संपुष्टात आणण्यासाठी म्हणूनच सुवर्ण मंदिरावरती  लष्करी कारवाई केली. या लष्करी कारवाईमुळेच शीख धर्मीयांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या. या लष्करी कारवाईचा रोष ठेवूनच इंदिरा गांधीचे अंगरक्षक सतवंत सिंह आणि बेअंत सिंह या दोघांनी ३१ ऑक्टोबर १९८४ ला सकाळी ८ वाजता इंदिरा गांधी पंतप्रधान कार्यालयाकडे जात असताना अंदाधुंद गोळीबार केला त्यामध्ये त्या शहीद झाल्या. आयरन लेडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदिरा गांधीचा असा दुर्दैवी अंत झाल्यानंतर,इंदिरा गांधी यांचे कनिष्ठ पुत्र राजीव गांधी यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची शपथ घेतली. इंदिरा गांधी प्रमाणेच आधुनिक भारताचे व्हिजन समोर ठेवून भारताला संगणक युगामध्ये सक्षमपणे पुढे नेण्याचे काम राजीव गांधींनी केले. आजही इंदिरागांधी आयर्न लेडी ऑफ इंडिया  म्हणून ओळखल्या जातात.

## निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की, भारतीय राजकारणात आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीत इंदिरा गांधी यांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्या भारताच्या पहिल्या आणि आजवरच्या एकमेव महिला पंतप्रधान होत्या. त्यांच्या  नेतृत्वाखाली भारताने आर्थिक स्वावलंबन, कृषी विकास, बँक राष्ट्रीयीकरण, अणुशक्तीची प्रगती आणि परराष्ट्र धोरणात महत्त्वाची प्रगती साधली. १९७१ च्या युद्धातील विजयामुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढली.त्यांच्या नेतृत्वशैलीत ठामपणा, निर्णयक्षमता आणि राष्ट्रीय हिताची जाणीव प्रकर्षाने दिसून येते. त्यांच्या नेतृत्वामुळेचआधुनिक भारताचीजडणघडण वेगाने झाली, हे नाकारता येणारनाही.

## संदर्भसूची (References)


१. बिपिन चंद्र, India Since Independence, Penguin, New Delhi.
२. रामचंद्र गुहा, India After Gandhi, HarperCollins.
३. इंदिरा गांधी, My Truth, Penguin.
४. सुमित सरकार, Modern India, Macmillan.
५. Granville Austin, Working of a Democratic Constitution, OUP
१) India Since Independence.New Delhi: Penguin Books, 2008.
६. गुहा, रामचंद्र.India After Gandhi: The History of the World’s Largest Democracy.New Delhi: HarperCollins, 2017.
७. सरकार, सुमित.Modern India: 1885–1947.New Delhi: Macmillan India, 2014.

८. ऑस्टिन, ग्रॅनव्हिल.Working of a Democratic Constitution: The Indian Experience.New Delhi: Oxford University Press, 1999.
९. गांधी, इंदिरा.My Truth.New Delhi: Penguin Books, 1980.
१०. जैन, एल.सी.Indira Gandhi: A Political Biography.New Delhi: Orient Longman, 1983.
११. मल्होत्रा, इंदर.Indira Gandhi: A Personal and Political Biography.New Delhi: Hodder & Stoughton, 1989.
१२. नायर, कुलदीप.India Under Indira Gandhi.New Delhi: Vikas Publishing House, 1975.
१३. भारत सरकार.Report of the Shah Commission on Emergency.New Delhi: Government of India, 1978.
१४. भारत सरकार.Economic Survey of India (1969–1977).Ministry of Finance, New Delhi.
१५. Planning Commission of India.Five Year Plan Documents (Fourth & Fifth Plans).New Delhi.
१६. सोनी, सोनिया.Indira Gandhi: Tryst with Power.New Delhi: Penguin, 1997.
१७. हुसैन, सैयद.Indira Gandhi and Indian Polity.New Delhi: Deep & Deep Publications, 1984.
१८. Dhar, P. N.Indira Gandhi, the Emergency, and Indian Democracy.New Delhi: Oxford University Press, 2000.